Estd-1962
NAAC `A'Grade

# शिवाजी विद्यापीठ,कोल्हापूर

## ५६ वा वार्षिक दीक्षांत समारंभ

## विद्यार्थ्यांसाठी निवेदन

- शिवाजी विद्यापीठाचा ५६ वा दीक्षांत समारंभ साधारणपणे डिसेंबर, २०१९ ते जानेवारी, २०२० दरम्यान नियोजित आहे
- ऑक्टोबर, २०१८ व एप्रिल, २०१९ सत्रातील आणि यापूर्वीच्या अंतिम परीक्षेमध्ये उत्तीर्ण व पात्र विद्यार्थ्यांनी पदवी/पदविका, प्रमाणपत्र मिळण्याकरिता विहित नमुन्यामध्ये ऑनलाईन आणि खाली दर्शविलेल्या मुदतीमध्ये विहित नमुन्यासह पदवी प्रमाणपत्र मागणीकरिता दीक्षांत अर्ज करणे आवश्यक आहे.

| | |
|---|---|
| १) २६ ऑगस्ट, २०१९ ते २७ सप्टेंबर, २०१९ पर्यंत शुल्क | रू. २५०/- |
| २) २८ सप्टेंबर, २०१९ ते १९ ऑक्टोबर, २०१९ पर्यंत विलंब शुल्क | रू. ३५०/- |
| ३) २० ऑक्टोबर, २०१९ ते ८ नोव्हेंबर, २०१९ पर्यंत अतिविलंब शुल्क | रू. ८५०/- |
| ४) पीएच.डी प्राप्त विद्यार्थ्याचे दीक्षांत अर्ज ३० नोव्हेंबर, २०१९ पर्यंत रू. ८५०/शुल्काने स्वीकारले जातील. | |

ऑनलाईन अर्जाची प्रिंट योग्य त्या कागदपत्रासहीत विभागात सादर करण्याची (समक्ष/ पोस्टाने) अंतिम तारीख दि. ३०/११/२०१९ राहील. मुदतीनंतर आलेल्या अर्जाचा विचार केला जाणार नाही.

- पदवी प्रमाणपत्र मागणीचा अर्ज; (Convocation Application) www.unishivaji.ac.in या संकेतस्थळावरून ऑनलाईन पध्दतीने भरून त्याची प्रिंट घ्यावी व अर्जासोबत आयडेंटीटी साईज एक फोटो, अंतिम वर्षाचा गुणतक्ता आणि भाग २ मधील पर्यावरणशास्त्र विषयाचा उत्तीर्ण गुणतक्ता जोडणे आवश्यक आहे. अर्जामध्ये पत्ता पूर्ण आहे किंवा नाही याची खात्री करून घ्यावी. **ऑनलाईन अर्ज भरताना प्रथम वेबसाईटवरील सूचना वाचाव्यात व आवश्यक ती माहिती सोबत ठेवावी.**
- ज्या परीक्षांचे निकाल जाहीर झालेले आहेत अशा परीक्षांची यादी विद्यापीठ संकेत स्थळावर ठेवण्यात आलेली आहे. त्या परीक्षांचे पदवी प्रमाणपत्र मागणी अर्ज ऑनलाईन प्रोसेस होतील.
- अर्ज ऑनलाईन भरताना जे विद्यार्थी २००६ पूर्वी उत्तीर्ण आहेत अथवा ज्या विद्यार्थ्यांचे फोटो ऑनलाईन दिसत नाहीत त्यांनी स्वत:च्या फोटोची JPEG file (20 kb) अपलोड करून नंतरच अर्ज ऑनलाईन भरावा. अपलोड केलेला फोटो संबंधित महाविद्यालयाच्या प्राचार्यांचेकडून सांक्षांकीत करणे आवश्यक आहे. यासाठी अर्जासोबत प्रपत्र 'P' (Annexure 'P') उपलब्ध होईल. यावर महाविद्यालयाचा सही शिक्का व प्राचार्याचे स्वाक्षरी घेणे आवश्यक आहे. सदरचा फोटो पदवी प्रमाणपत्रावर Black & White रंगात छपाई होईल.
- अर्ज भरताना विद्यार्थ्याचा ई-मेल आयडी व भ्रमणध्वनी क्रमांक नमूद करणे आवश्यक आहे. दीक्षांत समारंभाचे निमंत्रणपत्र व तपशिलवार माहिती विद्यार्थ्यांना SMS द्वारे कळविण्यात येईल. ऑन लाईन पैसे भरण्यासाठी खालील बँकेच्या खात्यावर पेमेंट गेट-वे सुविद्या उपलब्ध करुन देण्यात येईल.

| अ.नं | बँकेचे नांव | IFSC Code | Account No. |
|---|---|---|---|
| 1 | AXIS BANK | UTIB0000134 | 915020055386875 |

- वैद्यकीय शाखेच्या (Medical Faculty) विद्यार्थ्यांनी अर्जासोबत इंटर्नशीप पूर्ण केल्याच्या सर्टिफिकेटची प्रत जोडणे आवश्यक आहे.
- ज्या परीक्षांचा निकाल Viva-Voce Exam नंतर जाहीर करण्यात येतो त्या परीक्षेच्या दीक्षांत अर्जासोबत Declaration of Result letter/Award letter ची प्रमाणित प्रत जोडणे आवश्यक आहे. (उदा. Ph.D /M.Phil etc.)
- श्रेणीसुधार परीक्षेस बसून ज्यांच्या निकालात श्रेणीसुधार झालेली आहे अशा विद्यार्थ्यांनी पदवी प्रमाणपत्र मागणी करताना दीक्षांत अर्जासोबत पूर्वीचे मूळ पदवी प्रमाणपत्र विद्यापीठास परत करणे आवश्यक आहे. श्रेणी सुधारणा झाली नसलेल्या विद्यार्थ्यांनी अर्ज करू नयेत.
- अर्ज भरताना विद्यार्थ्यांनी आपला पूर्ण पत्ता बिनचूक लिहावा/ऑनलाईन भरावा. चुकीचा पत्ता दिल्यास पत्रव्यवहार पोहचू शकला नाही तर विद्यापीठ प्रशासन जबाबदार राहणार नाही
- दूरशिक्षणव्दारे शिक्षण घेणा-या विद्यार्थ्यांना, जी महाविद्यालये बंद आहेत अशा विद्यार्थ्यांना तसेच विद्यापीठ कार्यक्षेत्राबाहेरील (उदा. सोलापूर जिल्हा) विद्यार्थ्यांना रजिस्टर पोस्टाने पदवी प्रमाणपत्र पाठविण्यात येईल.
- सुधारित नियमावलीनुसार विद्यापीठाच्या अधिविभागातील पदवीधारकांना दीक्षांत समारंभात (On Campus) अथवा पोष्टाव्दारे आणि संलग्नीत महाविद्यालये, अभिमत/स्वायत्त महाविद्यालयातील पदवीधरकांना संबंधित महाविद्यालयामध्ये (Through College ) अथवा पोष्टाव्दारे पदवी स्वीकारता येईल याची नोंद घ्यावी.
- दीक्षांत समारंभापूर्वी पदवी प्रमाणपत्र प्राप्त होणा-या विद्यार्थ्यांची यादी व इतर अनुषंगिक सूचना विद्यापीठाच्या वेबसाईटवर वेळोवेळी प्रसिध्द करण्यात येईल.
- अपु-या अर्जाची दखल घेतली जाणार नाही आणि त्याबाबत पत्रव्यवहार करण्यात येणार नाही, याची नोंद घ्यावी.

**दीक्षांत विभाग**
दि .: २६/०८/२०१९

**श्री जी.आर.पळसे**
**प्र.संचालक**
**परीक्षा व मूल्यमापन मंडळ**